दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजश भांगे

## सुरेश धस यांनी बीडच्या जनतेचा विश्वास गमावला

**बीड–**भाजप आमदार सुरेश धस आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्यात भेट झाली. या भेटीवरून राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. तसेच भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी देखील आमच्या तिघांमध्ये साडे चार तास भेट झाल्याचे सांगितले आहे. यावरून आता ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी सुरेश धस यांच्यावर टीका केली आहे. सुरेश धस असे करूच कसे शकतात? असा सवालच सुषमा अंधारे यांनी उपस्थित केला आहे. सुषमा अंधारे म्हणाल्या, सुरेश धस बीडच्या जनतेचा विश्वास गमावत आहेत. मला संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांचे वाईट वाटते ज्यांनी सुरेश धस यांच्यावर एवढा विश्वास टाकला. सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांची भेट घेऊन बीडच्या जनतेचा विश्वास गमावला. सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणामध्ये कधी ते पोलिसांना माफ करा म्हणतात, कधी ते धनंजय मुंडेंच्या घरी जाऊन भेटतात. ही संभ्रमावस्था ते का निर्माण करतात? ते फक्त स्वतःचा विश्वास गमवत नाहीत तर ते देवेंद्र फडणवीस यांची विश्वासार्हता सुद्धा गमवत आहेत.

बीड/महाराष्ट्र · शनिवार दि.१५ फेब्रुवारी २०२५ · आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ · वर्ष २ रे · अंक-११८ · पाने ४ · किंमत ४ रुपये

# धनंजय मुंडे आणि सुरेश धस यांच्यात मतभेद पण मनभेद नाही

## आम्ही साडे चार तास सोबत होतो–चंद्रशेखर बावनकुळे



**मुंबई (वृत्तसंस्था)**
भाजप आमदार सुरेश धस यांनी राष्ट्रवादीचे नेते व मंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेतली आहे. या भेटीमुळे राजकीय वर्तुळात आता चर्चांना उधाण आले आहे. तसेच सुरेश धस यांच्यावर टीका देखील केली जात आहे. ही भेट तब्येतीची विचारपूस करण्यासाठी होती, वेगळा अर्थ काढू नये. आमचा लढा सुरूच राहणार, असे सुरेश धस म्हणाले आहेत.सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांच्या भेटीवर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. मी, धनंजय मुंडे आणि सुरेश धस साडेचार तास एकत्र होतो, अशी माहिती बावनकुळे यांनी दिली आहे. तसेच दोघांमध्ये मतभेद आहेत, मनभेद नाहीत. दोघेही इमोशनल आहेत. दोघांमध्ये थोडे मतभेद आहेत, ते दूर होतील, असेही चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले आहेत.पुढे बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, माणसाच्या जीवनात थोडा काळ असा असतो, काळ मतभेद दूर करतो. काही काळाने धनंजय मुंडे आणि सुरेश धस यांचे मतभेद दूर होतील असेही बावनकुळे म्हणाले. मी पक्षाचा अध्यक्ष आहे, मला दोघेही भेटले. धनंजय मुंडेंनी भाजपच्या प्रवासासोबत माझ्यासोबत काम केले आहे. त्यामुळे धनंजय मुंडे आणि सुरेश धस यांच्यातील भेट ही पारिवारीक भेट झाली आहे. आम्ही तिघेही परिवार म्हणून बसलो होतो. त्यांच्यात मतभेद आहेत, पण मनभेद नाहीत.

दरम्यान, एकीकडे सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्याविरोधात शड्डू ठोकलेला असताना दुसरीकडे त्यांची जाऊन भेट घेणे, यामुळे सुरेश धस यांचा ही दुटप्पी भूमिका असल्याची टीका आता राजकीय वर्तुळात केली जात आहे. मात्र धनंजय मुंडे यांच्या तब्येतीची विचारपूस करण्यासाठी मी त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेटलो होतो. यात वेगळी काहीच चर्चा झाली नाही. आमचा लढा सुरूच राहणार आहे. तब्येतीची विचारपूस आणि लढा हे दोन वेगळे प्रकार आहेत. आम्ही त्यांच्या विरोधात आहोत. या लढ्यात काहीच फरक पडणार नाही. तब्येतीची विचारपूस करण्यात गैर काय आहे? तसेच या भेटीचा वेगळा अर्थ तुम्ही काढू नका, असा सल्ला देखील सुरेश धस यांनी पत्रकारांना दिला आहे.दरम्यान, धनंजय मुंडे यांचे कार्यालयाने सुरेश धस आणि धनंजय मुंडे यांच्यात भेट झाली नसल्याचे म्हंटले आहे. तर सुरेश धस यांनी मी त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली असल्याचे माध्यमांशी बोलताना सांगितले आहे. तर दुसरीकडे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आमच्यात साडे चार तास भेट झाली असल्याचे म्हंटले आहे.

## नगर परिषदच्या निधीअभावा काळवटी साठवण तलावाच्या उंचीवाढीचे काम रखडले

**अंबाजोगाई । परवेज पटेल**
अंबाजोगाई तालुक्यातील काळवटी साठवण तलावाच्या उंचीवाढीसाठी ३.९४ कोटी रुपयांचा निधी नगर परिषदेने द्यावयाचा होता. परंतु अद्यापही नगर परिषदेच्या निधी उपलब्ध करून दिला नसल्याने उंचीवाढीचे काम रखडले आहे. त्यामुळे हा निधी लवकरात लवकर उपलब्ध करून घ्यावा असे पत्र बीड पाटबंधारेच्या उपअभियंत्यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना दिले आहे महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने ६ सप्टेंबर २०१९ रोजी मंजूर केलेल्या शासन निर्णयानुसार, काळवटी तलावाच्या उंचीवाढीला मंजुरी मिळाली होती. जलसंपदा विभागामार्फत हे काम पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, बदललेल्या दरानुसार या कामाच्या एकूण खर्चात वाढ झाली



असल्याचे केज विधानसभा मतदार संघाच्या आ. नमिता मुंदडा यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले होते. त्यानंतर संपूर्ण कामासाठी आता ८.११ कोटी रुपयांचा खर्च निश्चित करण्यात आला. यापैकी भूसंपादनासाठी ४.१७ कोटी रुपये तरतूद केली असून, उर्वरित ३.९४ कोटी रुपयांची मागणी तलावाच्या उंची २ मीटरने वाढवण्यासाठी तसेच दगड बसविणे, मुरुमाचे व काळ्या मातीचे परिक्षण करणे या कामांसाठी करण्यात आली आहे. यासंदर्भात यापूर्वीच नगरपरिषदेला निधी वर्ग करण्यास सांगण्यात आले होते, मात्र अद्याप निधी मिळालेला नाही. त्यामुळे हे काम रखडले असून, लवकरात लवकर हा निधी मंजूर करावा, अशी मागणी करण्यात येत आहे. दरम्यान, उंचीवाढीचे काम पूर्णत्वास गेल्यानंतर काळवटीची पाणी साठवण क्षमता ०.५ दलघमीने वाढणार आहे.

## होळ येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेत खो–खो संघाची कर्णधार प्रियंका इंगळेचा सत्कार

**केज । प्रतिनिधी**
तालुक्यातील होळ येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शाखेत व्यवस्थापक राहुल सावंत यांनी भारतीय महिला खो–खो संघाची कर्णधार प्रियंका इंगळे हिचा गुरुवारी (दि.६) सत्कार केला.

प्रियंका इंगळे भारताला पहिला खो–खो वर्ल्ड कप जिंकून दिला आहे. त्याबद्दल तिचा ठिकठिकाणी सन्मान केला जात आहे. होळ येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शाखेत देखील सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते नेताजी शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या पदवीधर सेलचे प्रदेशाध्यक्ष डॉ.नरेंद्र काळे, होळ येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे शाखा



व्यवस्थापक राहुल सावंत, होळेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक देवानंद मलदोडे, पाटोदा अंबा शाखेचे व्यवस्थापक प्रीतम गिरीगोसावी, मोरेवाडी शाखेचे व्यवस्थापक तोसिफ शेख, आडसचे शाखा व्यवस्थापक सचिन गोहोकर, सहायक शाखा व्यवस्थापक ज्ञानेश्वर बिराजदार, लिपिक पल्लवी गवांडे, सटवा मेंढके, दत्तु इंगळे, हनुमंत इंगळे, भगीरथ इंगळे यांच्यासह इंगळे कुटुंबीय, ग्रामस्थ उपस्थित होते.

# पिण्याच्या पाण्यासाठी मनसे आक्रमक; तीन दिवस आड पाणी न दिल्यास नगरपालिका विरोधात बोंब मारो आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**
बीड जिल्ह्यातील पाली येथील धरण व माजलगाव येथील धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध असतानाही नगरपालिकेच्या नकारत्यापणामुळे बीड शहरातील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती व पैसे मोजावे लागत आहे मात्र नगरपालिकेला जाग येत नसल्याने तीन दिवस आड पाणी न सोडल्यास तसेच शहरातील कचऱ्याचा निपटारा वेळेवर न केल्यास नगरपालिका विरोधात दिनांक २७ फेब्रुवारी रोजी नगरपालिका प्रशासनाच्या विरोधात बोंबाबोंब आंदोलन करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र निर्माण सेनेच्या महिला राज्य उपाध्यक्ष वर्षा जगदाळे जिल्हा उपाध्यक्ष सदाशिव बिडवे शहराध्यक्ष अमरजान पठाण यांनी मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. बीड शहराला पाणीपुरवठा करणारे माजलगाव येथील बॅक वॉटर धरण व पाली येथील बिंदूसरा धरणात यंदा चांगला पाऊस झाल्याने मुबलक पाणी साठा उपलब्ध आहे मात्र नगरपालिकेच्या चुकीच्या धोरणामुळे बीड शहरात तब्बल वीस ते पंचवीस दिवस पिण्याचे पाणी येत आहे यामुळे बीड शहरातील नागरिक हैराण झाले आहेत पाणीपट्टी वेळेवर घेणारे नगरपालिका प्रशासन शहरातील नागरिकांना पाणी वेळेवर देणार आहेत का असा सवाल उपस्थित करत शहरातील पाणीपुरवठा तीन दिवस आड सुरळीत न केल्यास बीड नगरपालिकेसमोर पाण्यासाठी बोंबाबोंब आंदोलन करण्यात येणार असल्याचे मनसेकडून सांगण्यात आले आहे या संदर्भात महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने मुख्याधिकाऱ्यांना आंदोलन करणार असल्याचा इशारा देण्यात आला असून उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे मनसेच्या वर्षा जगदाळे, सदाशिव बिडवे ,अमरजान पठाण यांनी आंदोलनाचे निवेदन दिले आहे.



# स्व.संतोष देशमुख यांच्या पत्नीला रमेशराव आडसकरांनी दिले नौकरीचे नियुक्ती पत्र;

## विशेष बाब म्हणून शासनाने दिली पद भरतीस मान्यता


**केज । अशोक गायकवाड**
मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांना आडस ता. केज येथील श्री. छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था संचलित छत्रपती शिवाजी विद्यालयात कनिष्ठ लिपिक पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. शासनाने विशेष बाब म्हणून त्यांच्या या पद भरतीस मान्यता दिली असून संस्थेचे सचिव रमेश आडसकर व राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेश्वर चव्हाण यांनी मस्साजोग येथे जाऊन त्यांना नियुक्तीपत्र सुपूर्द केले.

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडा नंतर त्यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे. अशी ग्रामस्थांची आणि विविध स्तरातून मागणी केली होती. त्या नुसार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शिक्षण संस्थेतील नोकरी बंद असल्याने विशेष बाब म्हणून पद भरतीसाठी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देऊन देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांना छत्रपती.शिक्षण संस्था आडस संचलित श्री. छत्रपती शिवाजी विद्यालयात कनिष्ठ विद्यालय आडस येथे लिपिक पदावर नियुक्ती देण्यात आली आहे.

त्यांना सुरुवातीचे तीन वर्षे परिविक्षाधीन कालावधीसाठी त्यांना प्रती महिना १० हजार रु. मानधन देण्यात येणार असून त्या नंतर मूळ वेतनश्रेणी दिली जाणार आहे.

शुक्रवार दि. १४ फेब्रुवारी रोजी श्री. छत्रपती शिक्षण संस्थेचे सचिव रमेश आडसकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेश्वर चव्हाण यांनी मस्साजोग येथे जाऊन अश्विनी देशमुख यांना नियुक्तीपत्र सुपूर्द केले. यावेळी रमेशराव आडसकर, राजेश्वर देशमुख आणि देशमुख यांच्या मातोश्री शारदाताई देशमुख, भाऊ धनंजय देशमुख, माजी उपसभापती ऋषिकेश आडसकर, केजचे उपनगराध्यक्ष पशुपतीनाथ दांगट, दिलीप गुळभिले, चिंचोली माळीचे सरपंच सुनील देशमुख, साळेगावचे सरपंच कैलास जाधव, सारणी (आ.) चे सरपंच संतोष सोनवणे, रंजित आडसकर हे उपस्थित होते.

मदितीचा धनादेश :–
या वेळी रमेश आडसकर यांनी देशमुख कुटुंबीयांना नोकरीच्या नियुक्ती पत्रा सोबतच ५ लाख ५५ हजार रु. चा मदतीचा धनादेश देखील सुपूर्त केला



## संपादकीय..

# कोकण मोहरतेय!



साधारणत: नोव्हेंबर अखेरपासून कोकणात थंडीची चाहूल लागते. डिसेंबर, जानेवारी महिन्याचा पहिला आठवडा किंवा पंधरवडा हा थंडीचा हंगाम असतो. कोकणातील कडाक्याची पडणारी थंडी ज्यांनी अनुभवलेली असेल ते काश्मीरच्या, नागपूरच्या थंडीलाही न घाबरता सामोरे जातील. थंडीच्या काळात फार छान आल्हाददायक वातावरण असतं. कडाक्याची पडलेली थंडी आणि चुलींवरची 'फुटी' चहा (दूध न वापरता बनवलेला) एकदम भारी. आजकाल अमेरिकन संशोधनानंतर डॉक्टर चहात दूध न टाकता चहा घ्या म्हणून सांगतात. त्यामुळे पूर्वीच्या या 'फुटी' चहाला आज ब्लॅक टीच्या नावाने जगभरात बारसं करून पंचतारांकित हॉटेल संस्कृतीतही त्याला मानाचा पान प्राप्त झालं आहे. अशा चहाचा आस्वाद घेत कोकणातील सामान्य माणूस जगातील सामाजिक, राजकीय घडामोडींवर कमालीच भाष्य केल्याशिवाय त्याला जमणारही नाही.

चालू हंगामात आंबा, काजू, कोकम, जांभूळ, सुपारी या पिकांचं काय होईल कशी स्थिती असेल या संबंधीही कोकणातील शेतकरी गजालींमध्ये रमताना दिसेल आणि भरपूर थंडी पडली तर तोच सामान्य शेतकरी, आंबा, काजू बागायतदार या जोरदार पडणाऱ्या थंडीने आंबा, काजूचा मोहर पाहून कमालीचा आनंदी झालेला दिसतो. यावर्षी पावसाळाही बाराही महिने आहे की काय? असं वाटण्याजोगी स्थिती होती. अधून-मधून केव्हाही पाऊस पडत होता. यामुळे कोकणात फक्त पाऊसच पडणार की काय? कोकणात थंडीच पडणार नाही असा चिंतातुर झालेला शेतकरी, बागायतदार होता; परंतु मागील पंधरवड्यात थंडी आली आणि आंबा, काजूच्या बागांमध्ये मोहोर दिसू लागला. आंबा, काजू बागायतीतील मोहोर पाहून निश्चितच बागायतदार शेतकरी सुखावला. याचे कारण वर्षभराची आर्थिक बेगमी होईल याचा आजच्या घडीला विश्वास बागायतदार शेतकऱ्यांना या आंबा, काजू मोहरामध्ये दिसू लागला आहे. आंबा, काजू, कोकम अशी कोकणात तयार होणारी फळ मागील काही वर्षात अनियमित होत आहेत. बागायतदार शेतकरी आर्थिक तोटा सहन करत आहे. मात्र, कोकणातील शेतकरी आंबा, काजू, कोकमचे नुकसान झाले तरीही शासनाकडून नुकसानभरपाई मिळण्याची वाट न पाहता किंवा आपल्याच बागायतीत बुलडोझर न फिरवता कष्टाची नव्याने मशागत करत प्रयत्न करीत राहातो. यावर्षी नाहीतर पुढच्या वर्षी तरी चांगल फळपीक येईल या अपेक्षेने असतो.

कोकणवासीय ज्या श्रद्धेने, भक्तिभावाने आपल्या लाडक्या गणरायाची वाट पाहतो त्याच अपेक्षेने यावर्षी फळपीक चांगलं येईल अशी अपेक्षा ठेऊन कोकणवासीय आहे. कोकणातील हापूस आंब्यावर ज्या पद्धतीने कर्नाटक आदी राज्यातील आंब्याच संकट आलेलं आहे. कोकणातीलही बाजारातून कर्नाटकचा आंबा विक्रीला बाजारात दिसतो. यामुळे कोकणातील आंबा बागायतदार शेतकऱ्यांवर केवढे मोठं संकट उभं आहे ते सहज लक्षात येऊ शकेल. याबाबतही कोकणातील आंबा बागायतदार शेतकऱ्यांनी फारच जागृकतेने विचार करण्याची आवश्यकता आहे. एकिकडे निसर्गाच बदलत्या हवामानाच संकट आहे. त्याचबरोबर फळ बाजारातही डुपलीकेट आंबा, काजू विक्रीला आणून त्यातूनही कोकणातील आंबा, काजूला बदनाम करण्याच काम फार मोठ्या प्रमाणात होत आहे. बागायतदार शेतकऱ्यांनी यासाठी एकसंध असलं पाहिजे. संघटनात्मकतेने याविरोधात उभं राहण्याची गरज आहे; परंतु कोकणातील बागायतदार शेतकरीही पक्षीय राजकारणामध्ये अधिक स्वारस्य घेऊन आहे. आंबा, काजू, कोकम, सुपारी आदी फळपिकांचं उत्पादन घेणारा शेतकरी जर संघटितपणे या सर्वांचा विचार करू लागला तर ते अधिक याग्य होईल.बागायतदार शेतकऱ्यांमध्येही सतत संवाद असणे आवश्यक आहे. फळपिकांवरची चर्चा होत राहायला हवी. त्यात कोकण कृषी विद्यापीठाचे कृषी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेतले पाहिजे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा, समस्यांवर उपाय कसे करायचे यासाठीचा सकारात्मक संवाद होत राहिला तर विक्री व्यवस्थेच्या बाजारातही कोकणचा दबाव आणि दबदबा तयार होईल. आज आंबा बागायतदार विखुरलेला आहे. तो संघटित होणार नाही याची खात्री एपीएमसी मार्केटमध्ये बसलेल्या आंबा दलालाना आहे. त्यामुळेच कोकणातील बागायतदार शेतकऱ्यांना वाट्टेल त्या पद्धतीने आंब्याला दर दिला जातो. हातरूमालाखाली आजही आंब्याचा दर ठरतो हे दुर्दैवच म्हणावं लागेल.

महाराष्ट्रातील ऊस, कापूस, द्राक्ष, डाळिंब, संत्री, मोसंबी अशा असंख्य फळपीक घेणारा शेतकरी संघटित आहे म्हणूनच वर्षानुवर्षे ऊस पिकवणारा शेतकरी शासकीय अनुदानाचे, नुकसानभरपाईचे टॉनिक दिलं जातं. वर्षानुवर्षे शासकीय अनुदानावर पश्चिम महाराष्ट्रातील ऊस पिकवणारा शेतकरी आणि साखर कारखाने उभे आहेत. यातला कुठलाच फारसा वाटा कोकणातील शेतकऱ्याला मिळाला नाही आणि यातही कोकणातील शेतकऱ्याला काय मिळत असेल तर कोकणातील शेतकरी तहसीलकडे अर्ज करून शेजारच्या शेतकऱ्याच नुकसान कसं झालं नाही हे दाखवण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे तिथेही आपण आपल्याच शेतकऱ्याला आडवं जातो. उर्वरित महाराष्ट्रात सर्वांनीच मिळून खाऊ याचा मोठा उद्योग होतो. कोकणातील शेतकरी, बागायतदार सरकारी अनुदानाच्या मेहरबानीवर नसतो हे अनेकवेळा कोकणाने दाखवून दिले आहे. कोकणातील आंबा, काजू बागायतीत झाडांवरचा मोहर पाहून कोकणवासीय सुखावला आहे. आता सर्वकाही निसर्गाच्याच हातात आहे.

# नायलॉन मांजाचे आणखी किती बळी?



आनंदाचे प्रतीक असलेल्या मकरसंक्रातीच्या सणाला नायलॉन मांजामुळे यंदाही गालबोट लागले आहे. संक्रातीच्या सणानिमित्ताने पतंगबाजीचा खेळ खेळला जातो. यासाठी पारंपरिक मांजाचा उपयोग करायला हवा. मात्र, अलीकडे नायलॉन मांजाचाच वापर करत पतंग उडवण्याची भारी हौस अनेकांसाठी जीवघेणी ठरत आहे. इतरांपेक्षा आपलाच पतंग उंच उडावा आणि आपणच पतंगाचे किंग ठरावे या ईर्षेतून चक्क प्रतिबंधित नायलॉन मांजा वापरून सर्रास पतंग उडवले जातात. दुसऱ्या बाजूला घातक मांजामुळे निष्पाप जीवांचे नाहक बळी जातात, याकडे दुर्लक्ष होते. अनेक दुचाकीस्वारांच्या गळ्याला इजा झाल्याच्या घटना तर अनेक बालकांचे हात चिरले जाण्याचे सर्रास प्रकार या दिवसांत कानावर येतात. एवढंच नव्हे तर आकाशात उडणाऱ्या पक्ष्यांचे जीवही धोक्यात आले आहे.

नाशिक जिल्ह्यामध्ये मनाला चटका लावणारी घटना मंगळवारी घडली. संक्रांतीच्या सणासाठी सोनू धोत्रे नावाचा तरुण गुजरातहून नाशिकला येत होता. पाच महिन्यांनंतर त्याचे लग्न होणार होते. सोनू धोत्रेच्या आई-वडिलांचे निधन झाले आहे. त्यामुळे तो सख्या भावाला भेटण्यासाठी आला होता. देवळाली कॅम्पकडे मोटर सायकलवरून जात असताना सोनूला नायलॉन मांजामुळे फास लागला अन् त्याचा गळा चिरला गेला. त्यात त्याला मृत्यूने कवटाळले. दुसऱ्या घटनेत नंदूरबारमधील कार्तिक गोरवे आजोबांसह मोटारसायकलवरून जात असताना, त्याच्या गळ्यात मांजा अडकला आणि कार्तिकचा गळा चिरला. कार्तिकला जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले; परंतु उपचारादरम्यान कार्तिकचा मृत्यू झाला. या घटनेने गोरवे कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

अकोला जिल्ह्यातील पालिका कर्मचारी मंगशे बोपटे हे दुचाकीवरून जात असताना गळ्यात मांजा अडकल्याने त्याचाही गळा चिरला गेला. त्याच्या गळ्यावर १५ टाके पडले. सुदैवाने त्याची प्रकृती स्थिर आहे. भंडारा जिल्ह्यात मोटार सायकलवरून जाणाऱ्या शुभम चौधरीचा गळा मांजामुळे चिरला गेला. सुदैवाने त्याचा जीव वाचला. यवतमाळ शहरासह जिल्ह्यात नायलॉन मांजा विक्रीवर जिल्हाधिकाऱ्यांनी बंदी आदेश काढलेला असतानाही पोलिसांच्या नाकावर टिच्चून नायलॉन मांजा विक्री आणि त्याचा वापर झाल्याचे चित्र संक्रांतीच्या दिवशी, यवतमाळ शहरात दिसले. या मांजाचा झटकाही एका ज्येष्ठ नागरिकाला बसला. पोलिसांकडूनही कडक कारवाई होणे अपेक्षित होते. मात्र, वरवरची कारवाई झाल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला. अशा अनेक घटना महाराष्ट्राच्या जिल्ह्या-जिल्ह्यांतून ऐकायला येत आहेत; परंतु प्रशासन म्हणावे तसे ॲक्शन मोडवर आल्याचे दिसत नाही. काही ठिकाणी कारवाईचा बडगा पाहायला मिळाला.

मांजाने बळी घेतल्याच्या घटनेनंतर सतर्क झालेल्या येवला पोलिसांच्या भरारी पथकाने कारवाई करत चौघांना ताब्यात घेतले. या चौघांकडून नायलॉन मांजा जप्त करण्यात आला. भिवंडीत महानगरपालिकेने केलेल्या धडक कारवाईत नायलॉन मांजा जप्त केला, अशा हाताच्या बोटावर मोजता येतील अशा कारवायांनी मांजा बंदी झाली असे म्हणायचे का? तसे पाहायला गेले तर पोलिसांना उशिरा सुचलेले शहाणपण म्हणावे लागेल. राज्यात प्लास्टिक बंदीचा कसा बट्याबोळ झाला हे जनतेने पाहिले आहे. कारवाई कोणावर होते तर ज्यांच्या हातात प्लास्टिकची पिशवी सापडते त्यांच्यावर? परंतु प्लास्टिकच्या पिशव्या उत्पादन करणाऱ्या कारखान्यांवर मोठी कारवाई झाल्याचे ऐकीवात नाही. त्यामुळे मुळावर घाव घालावा तसा प्लॉस्टिक बंदीसाठी ज्या ठिकाणी उत्पादन होते, त्याच ठिकाणी कडक कारवाई केली तर माल बाजारात आला नसता. तसाच काहीसा प्रकार नॉयलॉनच्या मांजांबाबत म्हणता येईल. हा मांजा ज्या ठिकाणी तयार होतो, तेथेच कारवाई केली तर बाजारात त्याचा साठा उपलब्ध होण्यावर अडचणी येतील; परंतु आपल्याकडे अनेक कायदे तयार होतात. मात्र, त्याची अंमलबजावणी करण्यावर उदासीनता दिसून येते.

नायलॉन मांजाच्या विक्री आणि वापरावर बंदी असतानाही प्रशासनाच्या सुस्त कारवाईमुळे दोघांना जीव गमवावा लागला, तर अनेकजण गळा चिरल्याने गंभीर जखमी झाले. या सणाला लागलेल्या गालबोटामुळे नायलॉन मांजा न वापरण्याचे आवाहन अनेक संस्थांनी केले आहे, तर नायलॉन मांजाच्या विक्रीविरोधात भरारी पथके नेमली असतानाही ही विक्री कशी सुरू आहे, हा प्रश्न कोड्यात टाकणारा आहे. त्याचे कारण जीवघेण्या नायलॉन मांजावर कायद्याने बंदी असली तरी ती फक्त कागदोपत्रीच मर्यादित असल्याचे चित्र सध्या तरी सर्वत्र पाहायला मिळत आहे. राज्यात आज संक्रात सणाच्या निमित्ताने पतंगबाजीचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. प्रत्येक मकरसंक्रातीला नायलॉन मांजावरील बंदीची चर्चा होते. पण, नायलॉन मांजा विकणाऱ्यांवर पोलीस प्रशासनाकडून जुजबी कारवाया केल्या जातात असे दिसते, त्यामुळे प्रशासनाकडून चिरीमिरी घेऊन नायलॉन मांजा विक्रीला छुपा पाठिंबा आहे का? असे अनेक प्रश्न नागरिकांच्या मनात आहेत. सध्या गल्लोगल्ली अनेक मुलांच्या हातात नायलॉन मांजा आणि गुंता झालेल्या नायलॉन मांजा रस्त्यावर पडलेला आढळून येत आहे. अनेकांचा जीव गेल्याच्या घटना घडत असतानाही, नायलॉन मांजा राज्यभरात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात विक्री होत आहे. आता या प्रकरणी पोलीस प्रशासन गंभीर दखल घेणार आहे की नाही? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जगाला हेवा वाटणारा प्रयागराजमधील महाकुंभ



प्रयागराज, भारतातील एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र. हिंदू धर्मात विशेष महत्त्व असलेल्या दुर्मीळ अशा महाकुंभ मेळ्याची सुरुवात यंदा प्रयागराजमध्ये झाली आहे. गंगा, यमुना आणि सरस्वती या नद्यांच्या संगमावर १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी या ४५ दिवसांच्या कालावधीत महाकुंभ मेळा हा हिंदूंचा धार्मिक उत्सव साजरा होत आहे; परंतु या वर्षीचा कुंभमेळा हा निव्वळ कुंभमेळा नसून तो महाकुंभमेळा आहे. १४४ वर्षांतून एकदा येणारा हा एक दुर्मीळ क्षण मानला जातो. दुर्मीळ ग्रहस्थितीमुळे यंदाच्या महाकुंभ मेळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. जगातील सर्वात मोठा धार्मिक मेळा असे या कुंभमेळ्याचे वर्णन सध्या केले जाते आहे. दर बारा वर्षांनी हरिद्वार, नाशिक, उज्जैन आणि प्रयागराज या चार ठिकाणी कुंभमेळा भरतो. यंदाच्या प्रयागराज कुंभमेळ्यात ४५ कोटींहून अधिक भाविक सहभागी होणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत असल्याने, त्याची दखल जगभरातील प्रमुख्य देशातील माध्यमांनी घेतली आहे.

महाकुंभ मेळ्यात गेल्या दोन दिवसांत लाखोंच्या संख्येने भाविक याठिकाणी दाखल झाले आहेत. विदेशी भाविकांनाही याची भुरळ पडली असून हा आध्यात्मिक मेळावा ते अनुभवत आहेत. पवित्र स्नान आणि आध्यात्मिक अनुभूतीमुळे विदेशी नागरिक महाकुंभ मेळ्यासह भारताचे कौतुक करताना दिसत आहेत. विशेष म्हणजे या महाकुंभ मेळ्यात सहभागी होण्यासाठी जगभरातून अनेक महिला यात्रेकरू आल्या आहेत. या महाकुंभ मेळ्यात सहभागी होण्याची संधी मिळाल्याने स्वतःला मी खूप भाग्यवान समजते. भक्ती योग आणि सनातन धर्माविषयीचे ज्ञान घेऊन आम्ही येथे आलो आहोत. आता गंगेत स्नान करण्यासाठी, सर्वांसोबत आध्यात्मिक साधना करण्यासाठी उत्सुक आहे, अशी प्रतिक्रिया पेरू देशातील एका यात्रेकरूने वृत्तसंस्थेला दिली आहे. भारताचा आत्मा या क्षणी खूप शक्तिशाली आहे. गुरू आणि शनी एका रेषेत आहेत. महाकुंभ हा केवळ भारतासाठी नाही, तर महाकुंभ सर्व जगासाठी आहे, अशी प्रतिक्रिया अमेरिकेतून आलेल्या एका भाविकाने व्यक्त केली. अमेरिकेतील प्रमुख माध्यम समूहांपैकी सीएनएन वृत्तसंस्थेने 'प्रयागराजमधील महाकुंभमेळा हा जगातील सर्वात मोठ्या धार्मिक कार्यक्रमांपैकी एक आहे. महाकुंभमेळास येणाऱ्या भाविकांची संख्या अचंबित करणारी आहे. महाकुंभमेळ्यात सेलिब्रिटी आणि परदेशी पर्यटक एकत्र येतात', असे वर्णन केले आहे, तर ब्रिटिश माध्यम समूहाचा भाग असलेल्या बीबीसीने या महाकुंभमेळ्याबाबत मानवतेचा सर्वात मोठा मेळावा असल्याचे वृत्तांकन करताना वर्णन केले आहे. वृत्तवाहिनीने प्रयागराजमध्ये विविध देशांतील भाविकांशीही संवाद साधला. अर्जेंटिनातून आलेल्या व्यक्तीने बीबीसीशी बोलताना सांगितले की, प्रत्यक्ष भक्ती काय असते, हे अनुभवण्यासाठी महाकुंभमेळात सहभागी झालो आहे. गंगा नदीने मला बोलावले, म्हणून मी इथे आलो आहे.

अमेरिकेची लोकसंख्या सुमारे ३४ कोटी आहे. त्यापेक्षा जास्त लोक म्हणजे अंदाजे ४५ कोटी उत्तर प्रदेश राज्यात पुढील ४५ दिवसांमध्ये या महाकुंभात स्नान करण्यासाठी पोहोचणार आहेत. सौदी अरेबियातील मुस्लिमांसाठी पवित्र स्थळे असलेल्या मक्का आणि मदीना येथे दरवर्षी हजसाठी जाणाऱ्या २० लाख लोकांपेक्षा कुंभमेळ्यातील संख्या जास्त आहे. त्यामुळे ही संख्या २०० पट अधिक मानायला हरकत नाही. त्यामुळेच हा कार्यक्रम उत्तर प्रदेश सरकारची एक मोठी परीक्षा असणार आहे. केंद्रातील मोदी सरकार आणि उत्तर प्रदेशमधील मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही सरकारकडून या कुंभमेळ्याची चोख व्यवस्था व्हावी याची दक्षता घेतली गेली आहे. उत्तर प्रदेश सरकारकडून महाकुंभासाठी पायाभूत सुविधांपासून स्वच्छतेपर्यंतचे ६ हजार ९०० कोटी रुपयांचे ५४९ प्रकल्प सुरू केले आहेत. त्याचप्रमाणे भाविकांना योग्य माहिती मिळावी यासाठी महाकुंभ-२०२५ च्या लोगोचे अनावरण करून वेबसाइट आणि ॅपदेखील लॉन्च केले. तसेच हे संकेतस्थळ भाविक आणि पर्यटकांसाठी हवाई, रेल्वे आणि रस्त्याने महाकुंभला पोहोचण्यासाठी मार्गदर्शक म्हणून ठरत आहेत. याद्वारे प्रयागराजमधील राहण्याची व्यवस्था, स्थानिक वाहतूक, पार्किंग, घाटांवर जाण्याचे दिशानिर्देश इत्यादींची माहिती उपलब्ध आहे. तसेच स्थानिक आणि जवळपासची आकर्षणे आणि पर्यटन स्थळांचे मार्गदर्शनही यात आहे. तसेच या महाकुंभमुळे उत्तर प्रदेश सरकारच्या महसुलात २५ हजार कोटी रुपयांची भर पडण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. या कार्यक्रमामुळे स्थानिक स्व-मदत गट, कारागीर, हॉटेलवाले, होमस्टे मालक, रेस्टॉरंट ऑपरेटर आणि खाद्यपदार्थ विक्रेत्यांना फायदा होणार आहे. पहिल्यांदाच कोणत्याही घटनेत इतक्या मोठ्या प्रमाणात चेहरा ओळखण्याचे तंत्रज्ञान आणि बायोमेट्रिक ओळख याठिकाणी वापरण्यात येत आहे, ज्यामुळे लोकांची सुरक्षितता सुनिश्चित होण्यास मदत होणार आहे आणि एखादी व्यक्ती हरवल्यास त्यांना शोधणे सोपे होणार आहे. कार्यक्रमादरम्यान लोक स्वच्छ आणि शुद्ध पाण्यात स्नान करतील याची खात्री करण्यासाठी गंगा नदीजवळ पाण्याची गुणवत्ता मोजण्यासाठी यंत्रणा बसवण्यात आली आहे. याशिवाय, १०० खाटांचे एक प्राथमिक रुग्णालय आणि २० खाटांचे दोन रुग्णालये या परिसरात उभारण्यात आली आहेत. श्रद्धेचा भाग म्हणून लाखो हिंदू धर्मिय मोक्ष प्राप्तीची कामना करण्यासाठी आणि पापाचा नाश करण्यासाठी कुंभमेळ्यात डुबकी मारून स्नान करत असले तरी, जगभरातील माध्यमे आता महाकुंभ मेळ्याकडे मोठा इव्हेंट म्हणून पाहत आहेत. गेल्या अनेक वर्षांच्या परंपरेनुसार दर बारा वर्षांनी होत असलेल्या कुंभमेळ्याची चर्चा पूर्वी भारतीयांपुरती असायची. आता विदेशातील अनेक देशांना महाकुंभ मेळ्यातील परंपरा, कथा जाणून घेण्याची जिज्ञासा निर्माण झाली आहे.

## अंबाजोगाई अंजनपूर येथे पीएम प्रणाम योजना जनजागृती कार्यक्रम

# रासायनिक खताची कार्यक्षमता वाढवण्यासाठी एफओएमचा वापर फायदेशीर:शिवप्रसाद येळकर

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

देशात दिवसेंदिवस रासायनिक खतांचा वापर वाढत चालला असून यामुळे जमीन, पाणी व हवा दूषित होत आहे. त्यामुळे सजिवांच्या आरोग्यास हानी पोहचत असून पिकांचे उत्पादन व उत्पादकता यांवरही विपरित परिणाम झाला आहे. शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात चळवळ उभी करुन पृथ्वी मातेचे आरोग्य संतकरी गट प्रशिक्षण




पुनर्पस्थापित करण्यासाठी अपेक्षित उपाययोजना करणे नैसर्गिक किंवा सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देणे, रासायनिक खतांचा वापर कमी करून सेंद्रिय व जैविक खतांच्या वापरास चालना देणे तसेच संसाधने संवर्धन तंत्रज्ञानास प्रोत्साहन देऊन जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी जनजागृती करण्याच्या हेतूने केंद्र सरकारने २०२३-२४ मध्ये 'पीएम प्रणाम' अर्थात प्रधानमंत्री प्रोग्राम फ़ॉर रेस्टोरेशन, अवेयरनेस जनरेशन, नॉरिशमेंट अँड अमेलिएप्रेशन ऑफ मदर अर्थ ही योजना सुरू केली आहे. या योजनेची जनजागृती करण्यासाठी केंद्र शासनाने मार्गदर्शक सूची प्रसारित केली असून पीएम प्रणाम किसान संगोष्टी उपक्रम राबवण्याच्या सूचना दिल्या आहेत. शेतकऱ्यांमध्ये पीएम प्रणाम योजनेची जनजागृती करण्याच्या अनुषंगाने नॅचरल शुगरचे चेअरमन बी बी ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर व कृषी विभागाचे कृषी सहाय्यक पंडित काकडे यांनी संयुक्त कार्यक्रम घेऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. ऊस विकास अधिकारी येळकर यांनी रासायनिक खतांचा असंतुलित वापर केल्यामुळे होणारे तोटे विस्तृतपणे समजावून सांगून किण्वन प्रक्रिया केलेले सेंद्रिय खत अर्थात फर्मेंटेड ऑरगॅनिक मॅन्युअर (एफ ओ एम) सोबत रासायनिक खतांची भट्टी लावून पिकांना दिल्यास रासायनिक खतांची कार्यक्षमता वाढेल तसेच जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होईल बाबत माहिती दिली. येळकर यांनी सद्यस्थितीत ऊस पिकामधील अन्नद्रव्यांच्या कमतरतेमुळे निदर्शनास येणारी लक्षणे यांची निरीक्षणे शेतकऱ्यांना दाखवून व्यवस्थापनासाठी १३०० ४५ हे विद्राव्य खत ५ ग्रॅम, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट चे मल्टीमायक्रोन्यूट्रिएंट २ मिली व वसंत ऊर्जा ५ मिली प्रति एक लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करण्याचा सल्ला दिला. ऊस पिकामध्ये सद्यस्थितीत निदर्शनास येत असलेल्या ऊसावरील पोंगे मर व लोकरी माव्याच्या एकत्रित व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस (२० टक्के प्रवाही) २० मिली प्रति किंवा सायपरमेथ्रीन (१० टक्के प्रवाही) १५ मिली किंवा फिप्रोनिल (५ टक्के एस.सी.) २० मिली प्रति दहा लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. लोकरी मावा पानांच्या खाली असल्याने व त्यावर लोकरीसारखे आवरण असल्याकारणाने कीटकनाशकाचे द्रावण किडी पर्यंत व्यवस्थित पोहोचण्यासाठी द्रावणास चिकटपणा येण्यासाठी उत्तम दर्जाचे स्टिकर १ मि.ली प्रति लिटर द्रावणामध्ये मिसळावे तसेच फवारणी करताना फवारणीचे द्रावण पानांच्या खालच्या बाजूने जाईल अशा पद्धतीने फवारणी करावी याची माहिती दिली. ऊस पिकामधील चाबुक काणी व्यवस्थापनासाठी प्रादुर्भावग्रस्त ऊसाचे बेट मुळासकट उपटून प्लास्टिकच्या पिशवीमध्ये घेऊन नष्ट करावे हे करत असताना काळी पावडर इतर ऊसावर किंवा शेतामध्ये पडणार नाही याची काळजी घ्यावी. काणी रोगाच्या प्रादुर्भाव व्यवस्थापनासाठी झॉक्सीस्ट्रॅबीन १८.२ टक्के अधिक डायफेनोकोनाझोल ११.४ टक्के एससी या संयुक्त बुरशीनाशकाची १० मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी याची माहिती दिली यावेळी मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. कृषी सहाय्यक पंडित काकडे यांनी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) योजनेच्या अंमलबजावण्यासाठी करावयाची कार्यवाही बाबत विस्तृतपणे माहिती दिली, तलाठी सुहास चाटे यांनी ॲग्री स्टॅक पोर्टल बाबत विस्तृत माहिती दिली, अदामा कंपनीचे प्रतिनिधी अविनाश पवार यांनी ऊस पिकामधील तण व्यवस्थापनाची माहिती दिली, आत्माचे चव्हाण व बर्दापुरे यांनी शेतकरी बचत गट स्थापन करण्यासाठी लागणारी कागदपत्रे यांची माहिती दिली यावेळी नॅचरल शुगरचे संचालक संभाजी रेड्डी, कृषी सहाय्यक चांगदेव आदमाने व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कुष्ठरोगविषयक संदेश देणाऱ्या मॅरेथॉन स्पर्धेला उत्स्फुर्त प्रतिसाद

**जालना । असलम कुरेशी**

जिल्ह्यात स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान, कुष्ठरोग निवारण दिन व जनजागृती पंधरवाडा दि. ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत साजरा करण्यात येत आहे. कुष्ठरोगविषयक संदेश जनसामान्यांपर्यत पोहोचवण्यासाठी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्ताने जिल्हास्तरीय खुली रन फॉन लेप्रसी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन दि. १३ फेब्रुवारी २०२५ रोजी करण्यात आले होते. या स्पर्धेचा शुभारंभ सहायक जिल्हाधिकारी पुलकित सिंग यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला.




जालना जिल्हा सामान्य रुग्णालयातून रन फॉन लेप्रसी मॅरेथॉन स्पर्धेला सुरुवात होवून सामाजिक न्याय भवन, जिल्हा परिषद मार्गे अंबड चौफुली, सतकर कॉम्प्लेक्स ते जिल्हा सामान्य रुग्णालय जालना येथून सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग) कार्यालयात मॅरेथॉनचा समारोप करण्यात आला.

सहभागी स्पर्धकांमधुन पुरुष गटात वैभव राजेंद्र शिंदे, आकाश रामेश्वर राठोड, सचिन मोहन चव्हाण यांची अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाने निवड करण्यात आली. तसेच महिला गटात प्रियंका लालसु ओकसा, शुभांगी वैजिनाथ म्हसलेकर, वैष्णवी बळीराम सोनटक्के यांची अनुक्रमे प्रथम, व्दितीय तृतीय क्रमांकाने निवड करण्यात आली. त्यांना रोख रक्कम पुरुष व महिला गटास अनुक्रमे ४ हजार रुपये, २ हजार ५०० रुपये, १ हजार ५०० रुपये व प्रशस्तीपत्र याप्रमाणे सहाय्यक जिल्हाधिकारी पुलकित सिंग, अतिरीक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गजानन मस्के, डॉ. एन.जी. पवार, वैद्यकिय अधिकारी डॉ. आर.यु. काकड, डॉ. जिल्हा हिवताप अधिकारी राहुल राऊत, सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. सुधाकर शेळके, वैद्यकीय अधिकारी डॉ. उत्कर्षा कड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. स्पर्धा यशस्वीतेसाठी सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) कार्यालयातील कर्मचारी एस.डी. सावंत, एन.जे.मगर, एस.जी. शेख, सुंदर देवकते, दत्ता डाके, डॉ. रोहन ठोंबरे, श्रीमती मुंदडा, अश्विनी दांड, फेरोज पठाण, प्रशांत दहीभाते, अश्विनी बदर तसेच जिल्हा हिवताप कार्यालय व जिल्हा क्षयरोग कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी परीश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन चक्रधर बागल यांनी केले.

## गंगापुर उपजिल्हा रुग्णालयातील शस्त्रक्रिया गृह सुरु



**छ. संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

गंगापुर येथील उपजिल्हा रुग्णालयातील नव्याने सुरू झालेल्या शस्त्रक्रिया गृहात पहिल्यांदा गरोदर महिलेचे सिझरिंग करण्यात आले असुन बाळ बाळंतीन सुखरुप.गेल्या एक वर्षापासून बंद असलेले ऑपरेशन थेटर आमदार प्रशांत बंब यांच्या प्रयत्नातून एक कोटी रुपये खर्चुन सुसज्ज असे (ऑपरेशन थेटर) शस्त्रक्रिया ग्रहाचे काम पूर्ण झाल्यामुळे एका गरोदरमहीलेचे सिझरिंग करण्यात आले आई व बाळ सुखरुप असल्याने नातेवाईकांनी डॉक्टरांचे आभार मानले. उपजिल्हा रुग्णालयात सिझरिंग साठी डॉक्टर उपलब्ध करण्यात आल्यामुळे दिनांक ११ फेब्रुवारी रोजी नव्याने सुरू झालेल्या सुसज्ज अशा शस्त्रक्रियागृहात ११ फेब्रुवारी रोजी एका गरोदर महीलेचे सिझरिंग डॉ. शितल जैस्वाल डॉ राहुल इंगळे, भुलतज्ञ डॉ चव्हाण,बालरोगतज्ञ डॉ मुंदडा मेट्रन कुलकर्णी, वाघ. नर्स शितल उदावंत, प्रमिला राऊत कर्मचारी गणेश कान्हे, भारती, पटेल आदींनी ही शस्त्रक्रिया यशस्वी केली. ऑपरेशन थिएटर सुरु झाल्याने छोट्या मोठ्या शस्त्रक्रियेला आता सुरवात झाली असुन यामध्ये मोठमोठ्या शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याचे वैद्यकिय अधिक्षक डॉ सुदाम लगास यांनी सांगितले.

## रमज़ान महिन्यात उर्दू शाळा सकाळच्या सत्रात करण्याची मागणी



**जालना । असलम कुरेशी**

पवित्र रसमज़ान महिन्यात दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील जिल्हा परिषदेच्या उर्दू माध्यमाच्या शाळा सकाळच्या सत्रात भरविण्याची मागणी अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात शिक्षणाधिकारी श्री कैलास दातखिळ यांना दिलेल्या निवेदनात रमज़ान महिन्यात उर्दू शाळांची वेळ बदलण्याची मागणी करण्यात आली. यावेळी अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष जावेद खान, सहसचिव मोहम्मद शकीब, साजेद रंगरेज, मोहम्मद सदाकत, शेख मोहसीन, मुजव्वीसुद्दीन, शेख नजमोद्दीन, इलियास मोहियोद्दीन आदी उपस्थित होते.

## यावर्षीही खत खरेदीसाठी शेतकऱ्यांना आर्थिक फटका

# कृषी दुकानदारांना कंपन्या लिंकिंग शिवाय खत देईना ही लिंकिंग थांबली तरच शेतकरी वाचणार

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

कृषी दुकानदारांकडून खत मागविण्यात येत आहेत. परंतु त्यांना कंपन्या लिंकिंग शिवाय खत देत नाहीत असे दुकानदार सांगत असल्याने याचा भुर्दंड शेतकऱ्यांना सोसावं लागणार आहे. यामुळे हा दुकानदारांचे लिंकिंग रोखले तरच यातून शेतकरी सुटू शकतात. यामुळे शासन आणि प्रशासनाने लक्ष घालून ही लिंकिंग बंद करावी अशी मागणी करण्यात येत आहे. दरवर्षी पेरणीच्या तोंडावर खत लिंकिंगचा मुद्दा चर्चेत येतो. यामुळे शेतकरी आणि कृषी दुकानदार यांच्यात वाद निर्माण होतात. याची ओरड झाल्यानंतर शासन, प्रशासन खोटा आव आणून लिंकिंग घेऊ नका असा फर्मान सोडतो. पण खत खरेदी करतानाच ती कृषी दुकानदारांना आलेली असते. त्यामुळे काहीही झाले तरी दुकानदार लिंकिंग शेतकऱ्यांच्या माथी मारतातच. खत घेणे आवश्यक असल्याने अडचणीतील शेतकरी आर्थिक भुर्दंड सोसतो. यावर्षी ही लिंकिंग

सुरूच असून, कृषी दुकानदारांनी खत खरेदी करण्यास सुरुवात केली आहे. रॅक लागत आहेत तशी दुकानदार खत खरेदी करु लागला आहे. पण एकही कंपनी लिंकिंग शिवाय खत देत नसल्याचे चित्र आहे. इफको डीएपी खतासोबत लिक्विड डीएपी लिंकिंग देत आहे तर चंबल युरिया खतासोबत लिंकिंग औषध, जय किसान खतासोबत लिंकिंग दहा किलोचे बॅक किंवा त्या कंपनीचे मटरेल अशा प्रकारे सर्वच कंपन्याचे त्यांचे त्यांच्या कंपनीचे लिंकिंग देत आहेत. अशी माहिती एका खत विक्रेत्याने दिली आहे. जर खरच शासन आणि प्रशासनाला शेतकऱ्यांची चिंता असेल तर त्यांनी ही खतांवरील लिंकिंग आताच थांबवावी, जर दुकानदारांनाच लिंकिंग आले नाही तर ते शेतकऱ्यांनाही देणार नाहीत. यामुळे शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन खत कंपन्यांकडून सुरु असलेली लिंकिंग थांबवावी अशी मागणी करण्यात येत आहे.

## जिल्हा रुग्णालयातून गरोदर महिलेचे मंगळसूत्र चोरीला

**रायगड । प्रतिनिधी**

अलिबाग जिल्हा रुग्णालयात चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असून, सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नुकतीच तपासणीसाठी आलेल्या गर्भवती महिलेचे अडीच तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र चोरीला गेल्याची घटना घडली आहे. या संदर्भात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अलिबाग तालुक्यातील रेवस-कोळीवाडा येथील तेजश्री कोळी या महिलेची तपासणी सुरू असताना तिचा रक्तदाब अचानक वाढल्याने तिला तातडीने मॅटर्निटी वॉर्डमध्ये भरती करण्यात आले. त्या वेळी तिच्या बहिणीने तिचे दागिने-ळपलर्श्रीवळपस कुडी, चमकी आणि मंगळसूत्र-बॅगेत ठेऊन ती बॅग स्वतःजवळ ठेवली. मात्र, रुग्णालयातील स्टाफने ती बॅग समोरच्या ड्रेसिंग रूममध्ये ठेवण्यास सांगितले. काही वेळाने महिलेला लघवी नमुना द्यायला जावे लागले. परत आल्यावर चमकी जमिनीवर पडलेली दिसली, मात्र बॅगेतील मंगळसूत्र गायब होते. महिलेने चोरीची तक्रार करताच रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी चौकशीचे आश्वासन दिले, मात्र कोणीच काही माहिती दिली नाही. सीसीटीव्ही फुटेज तपासले असता ड्रेसिंग रूममध्ये कोणी गेल्याचे आढळले नाही, असे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी अधिक तपास सुरू केला आहे.

# मानवलोक समाजकार्य महाविद्यालय आंबेजोगाई येथे दोन दिवसीय पर्यावरण संरक्षण प्रशिक्षण कार्यशाळा

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अंबाजोगाई डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर विद्यार्थी विकास मंडळ व मानवलोक समाजकार्य महाविद्यालय आंबेजोगाई येथील जलसाक्षरता केंद्र व ग्रीन क्लब च्या वतीने १२ व १३ फेब्रुवारी २०२५ रोजी दोन दिवसीय पर्यावरण संरक्षण प्रशिक्षण कार्यशाळा चे आयोजन करण्यात आले होते. या दोन दिवशीय कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. हरिदास पिसाळ, पर्यावरण अभ्यासक तथा प्राध्यापक, जनविकास महाविद्यालय बनसारोळा तसेच श्री राहुल गिरी, मराठवाडा विभाग समन्वयक, धएथड अभियान महाराष्ट्र शासन व युनिसेफ तसेच डॉ. नजीर शेख व डॉ. हनुमंत साळुंके यांच्या उपस्थितीत पार पडले. उद्घाटन प्रसंगी डॉ. हरिदास पिसाळ लोश समा

यांनी पर्यावरण संरक्षण काळाची गरज या विषयावर विद्यार्थ्यांना सखोल असे मार्गदर्शन केले त्यांनी पर्यावरणाची सद्यस्थिती व पर्यावरण संरक्षण करण्याचे साधे आणि सोपे उपाय विद्यार्थ्यांसोबत शेअर केले तसेच

रक्षण गर्यशाळा

पर्यावरणाचे फायदे तोटे, पर्यावरणामध्ये होणारे प्रदूषण आणि त्यामुळे मानवी जीवनावर होणारा परिणाम,



पर्यावरण दूषित होण्याची कारणे आणि उपाय याविषयी सखोल असे मार्गदर्शन केले. श्री राहुल गिरी यांनी पर्यावरणामध्ये

होत असलेले सततचे बदल व त्यामुळे जागतिक पर्यावरणामध्ये झालेला परिणाम याविषयी युनिसेफ ची भूमिका विशद केली. जागतिक स्तरावर होणाऱ्या या परिणामाचा अभ्यास करण्यासाठी आणि पर्यावरणामध्ये समतोल राखण्यासाठी खास उपाययोजना आखणे गरजेचे आहे याकरिता पर्यावरण अभ्यासकांच्या मदतीने पर्यावरण संरक्षणासाठी मराठवाड्यात व इतर ठिकाणी काम करणे गरजेचे आहे याकरिता महाराष्ट्र शासनाने उच्च शिक्षण व शालेय शिक्षण विभागाच्या वतीने पर्यावरणा चे समतोल राखण्यासाठी व संरक्षणासाठी महाविद्यालयीन युवकांमध्ये पर्यावरणाचे धडे देण्यासाठी व पर्यावरण पूरक युवक चळवळ निर्माण

करण्यासाठी युनिसेफ व महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या धएथड या अभियानाचा उद्देश व महत्त्व आणि अभियान कशा पद्धतीने राबवण्यात येत आहे याविषयीची भूमिका विशद केली. डॉ नजीर शेख यांनी जगामध्ये पर्यावरणाविषयी होत असलेले बदल आणि त्यामुळे मानवावर होणारे परिणाम याविषयी मत व्यक्त केले.

श्री समीरखान पठाण यांनी सद्यस्थितीमध्ये वाढत्या प्रदूषण ला आळा घालण्यासाठी मीयावाकी प्रकल्प मोठ्या प्रमाणात साकारण्यात यावा तसेच पर्यावरणाची शाश्वतता टिकवण्यासाठी भारतातील लोकांनी पाण्याचा योग्य वापर शेतीमध्ये सेंद्रिय पद्धत तसेच झाडांचे जतन व संवर्धन करणे काळाची गरज आहे सद्यस्थितीमध्ये जी झाडांची संख्या कमी झालेली आहे त्यामध्ये वाढ करणे अत्यंत गरजेचे आहे ज्यामुळे जमिनीमधील कार्बनची प्रमाण वाढेल पाण्याची पातळी वाढेल आणि जैवविविधतेचे निर्मिती होईल करिता जापनीज मियावाकी प्रकल्प राबवणे गरजेचे आहे असे त्यांनी प्रतिपादन केले

श्री राजेसाहेब किर्दत केंद्रीय मुख्याध्यापक जिल्हा परिषद शाळा पट्टीवडगाव यांनी आपल्या मार्गदर्शनात पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी झाडांचे जंगल केले पाहिजे याकरिता ग्रामस्थारापासून ते शासन स्तरावरील सर्व व्यक्तींनी प्रयत्न केले पाहिजेत तसेच माणसाने झाडाच्या सानिध्यात राहून त्याचा अनुभव घेतला पाहिजे झाड जगले पाहिजेत झाड टिकले पाहिजे आणि झाड जगवले पाहिजे याकरिता प्रत्येक व्यक्तीने प्रयत्न केला तर येणारा काळामध्ये मोठ्या प्रमाणात झाडांचे जतन होईल अन्यथा वाळवंट व्हायला वेळ लागणार नाही त्यामुळे मानवाने सभोवतालच्या वातावरणाचा विचार करून त्या त्या ठिकाणच्या झाडांची संख्या वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत व निसर्गरम्य जीवनशैली जगण्याचा प्रयत्न करावा येणाऱ्या काळात जर मानवाला चांगले जगायचे असेल तर पर्यावरण सुरक्षित राहिले पाहिजे याचे भान ठेवले पाहिजे करिता झाडांचे लागवड व संवर्धन मोठ्या प्रमाणात करणे गरजेचे आहे असे त्यांनी सांगितले डॉक्टर प्रकाश जाधव यांनी अध्यक्षीय समारोपामध्ये विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणाचे धडे शेत्र कार्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना देण्यात यावीत व पर्यावरण संवर्धन करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने झाड लावलेच पाहिजे आणि त्याचे जतन केलेच पाहिजे असे सांगितले.

प्रस्ताविकामध्ये डॉ हनुमंत साळुंके यांनी सदरील कार्यशाळा आयोजनाबाबतचा उद्देश आणि महत्व विशद केले सद्यस्थितीमध्ये पर्यावरणा मध्ये होत असलेले सततचे बदल आणि त्यामुळे दररोजच्या मानवी जीवनावर होणारा परिणाम याची जाणीव विद्यार्थ्यांना व्हावी तसेच सद्यस्थितीमध्ये सर्वांत जास्त

# सोमवारी घनसावंगी तहसील कार्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन

**जालना । असलम कुरेशी**

सामान्य प्रशासन विभागाने तालुकास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन महिन्याच्यि तिसऱ्या सोमवारी करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने तहसील कार्यालय घनसावंगी येथे तालुकास्तरीय लोकशाही दिन सोमवार दि. १७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती तहसीलदार योगिता खटावकर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

शासन परिपत्रक दिनांक २६ सप्टेंबर २०१२ नुसार सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी/अडचणी यांची न्याय व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून लोकशाही दिन तालुका स्तरावर राबविण्याचे निर्देश दिलेले असून प्रत्येक महिन्याचा तिसरा सोमवार लोकशाही दिनाचे आयोजन करावे. या अनुषंगाने दिनांक १७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसील कार्यालय, घनसावंगी येथे लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

तालुका लोकशाही दिन कार्यक्रमास तहसीलदार योगिता खटावकर यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून त्यामध्ये गटविकास अधिकारी, पोलीस निरीक्षक, तालुका आरोग्य अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, पशु वैद्यकीय अधिकारी, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र विद्युत पारेषण कंपनी, सहाय्यक निबंधक, मुख्याधिकारी, नगर पंचायत, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम, उप अभियंता, मृद व जलसंधारण, उप अभियंता, जि.प. बांधकाम, दुय्यम निबंधक, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी, उप अभियंता, जलसंधारण जि.प. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, यांचे तालुक्यातील विविध विभागाचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

सदरील लोकशाही दिनामध्ये तक्रार/निवेदन वैयक्तिक स्वरूपाची असावी. लोकशाही दिनाकरिता अर्जदाराने अर्ज विहीत नमुन्यात १५ दिवस आधी २ प्रतित देणे आवश्यक राहील.

लोकशाही दिनामध्ये पुढील बाबींशी संबंधित अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/अपिल्स, सेवाविषयक, आस्थापना विषयक बाबी, विहीत नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज, अंतिम उत्तर दिलेले आहे/देण्यात येणार आहे अशा प्रकरणी पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्ज, तक्रार/निवेदन वैयक्तिक स्वरूपाची नसेल तर सदरील लोकशाही दिनात तालुक्यातील नागरीक, महिला व शेतकरी बांधवांच्या अडीअडचणी जाणून घेऊन त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यात येणार आहे. तसेच दिनांक १७ फेब्रुवारी २०२५ पासून तालुकास्तरीय लोकशाही दिन दरमहा तिसऱ्या सोमवारी सुरूच राहणार असल्याची माहिती तहसीलदार योगिता खटावकर यांनी दिली




## केज येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात टिप्पर आणि मोटरसायकलचा अपघात:अपघातात वृद्ध महिला जखमी

**केज । गौतम बचुटे**

केज येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात टिप्पर आणि मोटार सायकलच्या अपघाता वृद्ध महिला जखमी झाली आहे. या बाबतची माहिती अशी की, दि १४ फेब्रुवारी रोजी बाळासाहेब सुखदेव घुले रा. हंगेवाडी ता. केज हे त्यांची आई जनाबाई सुखदेव घुले हे दोघे तहसील कार्यालयातील काम आटोपून गावाकडे जात असताना दुपारी १२:३० वा. च्या सुमारास छत्रपती शिवाजी चौकात त्यांच्या मोटार सायकल क्र. (एम एच-२४/यु-५५४९) ला टिप्पर क्र. (एम एच-२४/ए यु-२५३४) ने धडक दिली. या अपघात जनाबाई घुले यांच्या उजव्या पायाला गंभीर मार लागलेला असून मोठ्या प्रामाणावर रक्तस्त्राव झालेला आहे.



दरम्यान अपघात झाला; त्यावेळी चौकात उपस्थित असलेले पत्रकार अजय भांगे आणि सन्नी शेख यांनी जखमी महिलेस एका खाजगी वाहनाने उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात घेऊन गेले. अपघात नंतर टिप्पर चालक टिप्परसह पळून जात असताना पत्रकार संतोष गलफाडे, गौतम बचुटे, अजय भांगे, सन्नी शेख, सामाजिक कार्यकर्ते खदिर कुरेशी यांनी मोटार सायकली वरून टिप्परचा पाठलाग करून टिप्पर थांबवले. त्या नंतर माहिती मिळताच पोलीस हेडकोस्टबल बालासाहेब बांगर अपघातग्रस्त टिप्पर व त्याच्या चालकाला ताब्यात घेतले आहे.

जखमी जनाबाई घुले हिला पुढील उपचारासाठी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयात हलविले आहे.

## रोटरीच्या शैक्षणिक साहित्य उपक्रमा अंतर्गत शाहू विद्यामंदिरला टीव्ही संच भेट

**केज । अशोक गायकवाड**

रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ अंतर्गत रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांच्या पुढाकाराने, डिस्ट्रिक्ट गव्हर्नर नॉमिनी जयेश पटेल यांच्या मेसर्स पी पी पटेल अँड कंपनी आणि रोटरी फौंडेशन च्या अर्थसह्याने व रोटरी क्लब ऑफ केजच्या उपक्रमांअंतर्गत केज शहरातील राजर्षी शाहू विद्यामंदिर शाळेला टीव्ही संच भेट देण्यात आला.



शैक्षणिक साहित्यांतर्गत विद्यार्थ्यांना आकलन क्षमता वाढावी व शिक्षण अधिक सुलभ होऊन अभ्यासाची गोडी निर्माण करण्याच्या उद्देशाने या टीव्ही संचाची अभ्यासक्रमाची डिझायनिंग करण्यात आली आहे. डिजिटल क्लासरूम च्या माध्यमातून गरजू शाळांना आपल्या अध्यापनाचा दर्जा उंचावण्यासाठी रोटरी ने हा उपक्रम हाती घेतला आहे. येत्या पाच वर्षात प्रतिवर्षी जिल्ह्यातील शंभर शाळांना अशा डिजिटल रुम तयार करण्यासाठी रोटरी मदत करणार आहे. केज शहरातील राजर्षी शाहू विद्यामंदिर या शाळेत पहिल्या उपक्रमात अंतर्गत हा टीव्हीसंच भेट देऊन त्यामध्ये इयत्ता पहिली ते दहावीचा अभ्यासक्रम इन्स्टॉल करण्यात आला आहे. यावेळी सोलापूर रोटरीचे रो अतुल चव्हाण, रो महेश साळुंके, रो उदय शिंदे , केज रोटरीचे अध्यक्ष प्रकाश कामाजी, सचिव अनंत तरकसबंद, केज रोटरीचे हनुमंत भोसले, प्रवीण देशपांडे, सत्यवान राऊत, संस्थेचे अध्यक्ष ऍड राजेसाहेब देशमुख, सचिव जी बी गदळे, मुख्याध्यापिका सौ चाटे-गदळे, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.यावेळी या महत्त्वाच्या उपक्रमाला आर्थिक सहाय्य करणाऱ्या मे. पी पी फौंडेशन चे केज रोटरीने विशेष आभार मानले.

## सुदर्शन घुले याला न्यायालयीन कोठडी; पोलीस पथक आरोपीला घेवून जिल्हा कारागृहाकडे रवाना




**केज । गौतम बचुटे**

संतोष देशमुख हत्याकांडातील प्रमुख आरोपी दर्शन घुले याची आज दि. १४ फेब्रुवारी रोजी पोलीस कोठडी संपली असून त्याला सीआयडीने केज पोलीस ठाण्यातून न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. न्यायालयीन कोठडी सुनावली नंतर पोलीस पथक आरोपीला घेवून जिल्हा करागृहाकडे रवाना झाले आहे.बीड जिल्ह्यातील मस्साजोग ता. केजचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून निर्घृण हत्या प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असलेला आरोपी सुदर्शन घुले याला दि. ११ फेब्रुवारी रोजी सीआयडीचे उपअधीक्षक अनिल गुजर यांनी त्याला १२ फेब्रुवारी रोजी केज न्यायालयाच्या प्रथम वर्ग न्यायाधीश एस व्ही पावसकर यांच्या न्यायालयात हजर केले होते.

प्रथम वर्ग न्यायाधीश एस व्ही पावसकर यांनी सुदर्शन घुले याला दि. १४ फेब्रुवारी पर्यंत सीआयडी कोठडी सुनावली होती. डी आय डी कोठडीत त्याचे व्हॉईस सँपल्स घेण्यात आले असून ते पडताळणीसाठी फॉरेन्सिक लॅबला पाठवून दिले आहेत.त्याची आज दि. १४ फेब्रुवारी रोजी पोलीस कोठडी संपत असल्याने त्याची उपजिल्हा रुग्णालय केज येथे तपासणी करून त्याला न्यायालयात हजर केले. क स्तरीय न्यायालयाच्या प्रथम वर्ग न्यायाधीश एस. व्ही. पावसकर यांनी त्याला न्यायालयीन सुनावण्यात आली आहे. या वेळी सरकारी पक्षाचे वकील ड. जितेंद्र शिंदे यांनी काम पाहिले.

दरम्यान न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडीत आदेश होताच सीआयडी आणि पोलिसंचे पथक सुदर्शन घुले याला घेवून जिल्हा कारागृहाकडे रवाना झाले आहे.

## प्रबोधनकार ठाकरे विद्यालय येथे दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न

**सोलापूर । विश्वास चोपडे**

प्रबोधनकार ठाकरे विद्यालय कव्हे येथे दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ दिनांक १४/०२/२०२५ रोजी आयोजित करण्यात आला होता यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक सुधीर क्षीरसागर, सत्यशोधक समाजसेवी संस्था संचलित कुर्डूवाडीचे संस्थेचे सचिव संजय घाडगे शाळेचे मुख्याध्यापक यादव सर उपस्थित होते.यावेळी प्राध्यापक क्षीरसागर यांचे गुलाब पुष्प व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले.




कार्यक्रमाला उपस्थित असणारे क्षीरसागर सर यांनी विद्यार्थ्यांना संबोधन करताना ते म्हणाले आपल्या मनगटामध्ये रग असली पाहिजे आणि हृदयामध्ये धग असली पाहिजे परंतु ती कशाची अभ्यासाची असली पाहिजे.त्यापुढेही ते म्हणाले आई-वडिलांना कधीही विसरू नका आपल्यावरचे त्यांचे उपकार कधीच फेडता येणार नाहीत आई-वडिलांनी आपल्याला जन्म दिला.आई बापाचे थोडे तरी उपकाराची परतफेड करता आली पाहिजे आई वडिलांचे ऋण फेडल्याशिवाय मरनाचे सुद्धा नाव घ्यायचे नसते.

ते पुढे म्हणाले येथून तुम्हाला काय घेऊन जायचे आहे तर ते म्हणजे ज्ञानाची शिदोरी घेऊन जायचे या शिक्षकांनी तुम्हाला पाचवीपासून दहावीपर्यंत जे दिलेले आहे त्याचा उपयोग करायचा आहे आपल्याला शिक्षकांनी काय दिले आहे ते म्हणजे ज्ञान आहे. अशाप्रकारे विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले व दहावीच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.

मुख्याध्यापक यांनी विद्यार्थ्यांना उज्वल भविष्याबद्दल शुभेच्छा दिल्या. वर्ग शिक्षक लष्ठे सर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच शिंदे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी विद्यार्थ्यांना खाण्यावर नियंत्रण ठेवा यामध्ये तिखट आंबट खाऊ नका असा सल्ला दिला. दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या शिवनेरी भरत दिवे हिने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तसेच आता दहावी मधील विद्या काळे रेणुका यादव, सिद्धीका काळे,आदर्श चोपडे, श्रावणी काळे, सहारा मुलानी, अमन शेख, यांनी शाळेबद्दल व शिक्षकांबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. तसेच कार्यक्रमाला सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचे प्रमुख पाहुण्यांच्या व मुख्याध्यापक, शिक्षकांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन शुभेच्छा दिल्या. सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला. अशाप्रकारे कार्यक्रम संपन्न झाला.

## ज्याचे आचरण चांगले तोच वारकरी संप्रदायाचा तात्विक अधिकारी-ह.भ.प.बाळू महाराज गिरगावकर

**केज । अशोक गायकवाड**

एखाद्या वेळीमहाराजांच्या पाया पडू नका परंतु वारकऱ्यांच्या पाया जरूर पडा कारण वारकरी हा सर्वात पवित्र आहे.ज्याचे आचरण चांगले तोच वारकरी संप्रदायाचा तात्विक अधिकारी आहे असे विचार ह.भ.प.बाळू महाराज गिरगावकर यांनी केज तालुक्यातील वरपगाव येथील वै.महंत रामकृष्ण महाराज यांच्या स्मृती सप्ताह निमित्त चौथ्या दिवसाच्या कीर्तन सेवेत व्यक्त केले.केज तालुक्यातील वरपगाव येथील शिवरामपुरी मठ संस्थानाला साडे तीनशे वर्षाची प्रबोधनाची परंपरा आहे.या पूर्वी नागेशपुरी महाराज व त्यानंतर रामकृष्ण महाराजांनी या मठ संस्थांनाअंतर्गत वरपगाव व पंचक्रोशी सह दूरदूर पर्यंत समाजप्रबोधनाचे कार्य केले.त्यानंतर त्यांचे उत्तराधिकारी म्हणून ह.भ.प.भगवान महाराज शास्त्री या मठ संस्थानाचे कार्य करत आहेत.दरवर्षी मठसंस्थान सप्ताहाचे आयोजन करत असते. यावर्षीही सप्ताहात अनेक नामवंत कीर्तन



कारां ची सेवा पार पडत आहे.बुधवारी रात्री ह.भ.प.बाळू महाराज गिरगावकर यांनी संत निळोबा महाराज यांच्या अभंगावर आपले कीर्तन केले.यावेळी त्यांनी उपस्थित भक्तांच्या आचरणात सत्य आचरण असावे.युवकांनी परिश्रम करावे असे आवाहनकेले. कीर्तन हे मनोरंजन म्हणून ऐकू नका किर्तनातील विचारांचा समाज परिवर्तन होण्यासाठी वापर व्हावा अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.आपल्या स्पष्ट विचारासाठी परिचित असणाऱ्या गिरगावकर महाराजांनी प्रयत्न करणारा व्यक्तीआयुष्यात कधीच अयशस्वी होत नसल्याचे सांगून आई वडील ईश्वराचा अंश असून प्रत्येकाने आपल्या आई वडिलांची सेवा करावी असे आवाहन केले.यावेळी वरपगावचे मठाधिपती भगवान महाराज शास्त्री,केज पंचायत समितीचे माजी सभापती राजेसाहेब देशमुख,ऍड.लक्ष्मणराव भोसले,प्राचार्य आबासाहेब देशमुख,डॉ. टी.एल.देशमुख यांच्या सह हजारो भाविक उपस्थित होते.

### शिवजयंती निमित्ताने महिला मराठा क्रांती ग्रुपचे पुरस्कार जाहीर

## शिवमती सीताबाई जाधव,निलावती गायकवाड,अप्रूगा जाधव पुरस्काराच्या मानकरी

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त दरवर्षी कर्तृत्ववान महिलांना जिजाऊ रत्न पुरस्कार दिले जातात. हे पुरस्कार महिला मराठा क्रांती ग्रुप च्या वतीने राज्यस्तरावर दिले जातात. यावर्षी या पुरस्कारासाठी बीडच्या तीन महिलांचा समावेश करण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्ताने महिला मराठा क्रांती ग्रुप च्या वतीने राज्यस्तरावर कर्तृत्ववान महिलांना पुरस्कार दिले जातात .त्यांच्या कार्याचा पुरस्कार देऊन गौरव केला जातो. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शिवजयंतीच्या निमित्ताने बीड येथील शिवमती सीताबाई बलभीमराव जाधव, शिवमती निलावती मच्छिंद्र गायकवाड, शिवमती अप्रुगा उत्तरेश्वर जाधव या तीन महिलांना हे पुरस्कार देण्यात येणार असून या कर्तृत्वावर महिलांचे महिला मराठा क्रांती ग्रुप च्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे. शिवजयंतीच्या निमित्ताने या पुरस्काराचे वितरण दिनांक २० फेब्रुवारी




रोजी सकाळी १०.३० वाजता शांतिनिकेतन इंग्लिश स्कूल पांगरी रोड बीड येथे मनोज दादा जरांगे पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून शिवमती कुंदाताई काळे तर प्रमुख पाहुणे म्हणून शिवमती रत्नमालाताई धांडे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन महिला मराठा क्रांती ग्रुपच्या वतीने करण्यात आले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077